**राज्य सहकारी निव धिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.**
**जुनी मध्यवर्ती इ मजला, पुणे-४११००१.**
फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/७७२/२०१४.
दिनांक :१२/११/२०१४.

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला.

**विषय : 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी/प्राधिकृत अधिकारी यांच्या नेमणूकीस मान्यता देणेबाबत...**
**संदर्भ :** आपले जिल्हयाचे ई-मे ल व्दारे प्राप्त झालेले १) जा.क्र. विनियम/निवडणूक/अहवाल/८८४८/२०१४ दि.०५/११/२०१४ व २) जा.क्र. विनियम/निवडणूक/अहवाल/८८६२/२०१४ दि.०७/११/२०१४ रोजीचे प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भांकीत विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येऊन कळविणेत येते की,

२/- आपले ई-मेल व्दारे प्राप्त झालेल्या संदर्भीय प्रस्तावाव्दारे, आपण अकोला जिल्ह्यातील दि.३१/०३/१३ व ३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र असलेल्या 'ड' वर्गामधील संदर्भ पत्र क्रं.१ मधील २१ संस्था व पत्र क्रं.२ मधील ३ संस्था, अशा एकुण २४ सहकारी संस्थाच्या निवडणुक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नेमणुक व त्यांचे कृती कार्यक्रमाच्या प्रस्तावास मंजुरी मिळणेस्तव या कार्यालयास विनंती केलेली आहे.

प्रस्तावातील **दि.३१/०३/१३ अखेर 'ड' वर्गातील निवडणुकीस पात्र संस्थांची संख्या ८** (अकोला तालुक्यातील ५ संस्था, बार्शिटाकळी तालुक्यातील १ संस्था,अकोट तालुक्यातील २ संस्था) **आणि दि.१/०४/१३ ते दि.३१/१०/२०१४ अखेर 'ड' वर्गातील निवडणुकीस पात्र संस्थांची संख्या १६ (अकोला तालुक्यातील १३ संस्था, बाळापुर तालुक्यातील १ संस्था, मुर्तिजापुर तालुक्यातील १ संस्था, अकोट तालुक्यातील १ संस्था) अशा एकुण पात्र २४ संस्थांच्या** प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या नेमणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

'ड' वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुका ह्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७६, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम ६० मधील तरतुदी अंतर्गत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) २०१४ मधील नियम ७६ नुसार तसेच संस्थेचे मंजुर उपविधीप्रमाणे पार पाडणे आवश्यक आहे.

सबब त्यास अनुसरुन आपल्या जिल्ह्यातील **दि.३१/०३/१३ अखेर व दि.१/०४/१३ ते ३१/१०/२०१४ अखेर निवडणुकीस पात्र 'ड' वर्गातील एकुण पात्र २४ संस्थांच्या** प्राधिकृत अधिकारी नियुक्तीच्या प्रस्तावात शिफारस केल्याप्रमाणे खालील शर्तीस अधिन राहुन सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मधील त्या-त्या संस्थांच्या नावासमोर दर्शविलेल्या व्यक्तिनां प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आहे. **तसेच उक्त नियुक्त अधिकारी यांनाच त्या त्या संस्थांच्या नियम ७७ नुसार पदाधिकारी निवडीच्या सभेसही प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात येत आ हे.**

१. प्रस्तावात नमुद केलेल्या संस्थांचा प्रस्तावित विशेष साधारण सभेची नोटीस काढण्याचा दिनांक व सभेचा दिनांक (दोन्ही दिवस वगळुन) यामध्ये नियम ७६ मधील तरतुदीप्रमाणे **१५ दिवसांची मुदत** असेल याची दक्षता घ्यावी.
२. संस्थेच्या अधिमंडळाच्या विशेष बैठकीचा दिनांक १/११/२०१४ नंतरचा असावा.
३. गृहनिर्माण सहकारी संस्थांचे अधिमंडळाचे विशेष बैठकीचा दिनांक शक्यतो रविवार असावा.
४. प्राधिकरणाचे दि.१८/१०/२०१४ रोजीचे 'ड' वर्ग संस्थांचे निवडणुकीबाबतचे सर्वसाधारणपर मार्गदर्शन सुचना तालुका सहकारी निवडणुक अधिकारी/ जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांनी संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यास अवगत कराव्यात.
५. **'ड' वर्गात समाविष्ट नसलेल्या संस्थांच्या निवडणुकीकरता प्राधिकृत अधिकारी नेमता येणार नाहीत असे झाले नाही याची खात्री तालुका सहकारी निवडणुक अधिकाऱ्याने प्राधिकृत अधिकारी यांना अवगत करणेपुर्वीच करावी.**

**सदरचे नियुक्ती आदेश मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मान्यतेने व निर्देशाप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत :** माहितीस्तव व याग्य त्या कायवाहीस्तव संबंधित तालुका सहकारी निवडणुक अधिकारी.

**परिशिष्ट अ**

**राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाकडील कार्यालयीन पत्र जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सं.कृ.का./प्रा.अ./मान्यता/ १७७ /२०१४ दि. १२/ ११ /२०१४ चे आदेशासोबतचे अ परिशिष्ट**

| अ. क्र. | तालुक्याचे नाव | सहकारी संस्थेचे नाव | विशेष सर्वसाधारण सभेचे अध्यक्षाचे नाव व हुद्दा |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | अकोला | रचना स्टेट बँक कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | वाय.पी.लोटे, सह अधि-2 |
| 2 | अकोला | मोरेश्वर गृहतारण सहकारी संस्था म अकोला | पी.एम.नटकुट उपलेप |
| 3 | अकोला | सहकार खाते गृहनिर्माण सहकारी संस्था म अकोला | वाय.पी.लोटे, सह अधि-2 |
| 4 | अकोला | तापी सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | ए.ए.मनवर ,<br>मुख्य लिपीक |
| 5 | अकोला | सातपुडा सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | ए.ए.मनवर , |
| 6 | अकोला | सहयंाद्री सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | ए.एस.सानप लेप2 |
| 7 | अकोला | कुलस्वामिनी गृहतारण सहकारी संस्था म अकोला | ए.एस.सानप लेप2 |
| 8 | अकोला | अकोला न प कर्म गृह सहकारी संस्था म अकोला | पी.एम.नटकुट उपलेप |
| 9 | अकोला | बल्हाडेश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | डी.एस.सातरोटे सअ1 |
| 10 | अकोला | सिध्देश्वर सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | डी.एस.सातरोटे सअ1 |
| 11 | अकोला | गिरजात्मक सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | ए.एम.भाकरे सअ 2 |
| 12 | अकोला | चिंतामणी सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | ए.एम.भाकरे सअ 2 |
| 13 | अकोला | विदया नगर सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | के के चंुगडे लेप 2 |
| 14 | अकोला | स्वस्तिक सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | एन डी धार्मिक सअ2 |
| 15 | अकोला | दि अकोला क्लॉथ मार्केट कम सह गृहनिर्माण संस्था म अकोला | व्ही.व्ही.सपकाळ लेप2 |
| 16 | अकोला | राजरत्न मागासवर्गीय गृहनिर्माण सहकारी संस्था म अकोला | व्ही.व्ही.सपकाळ लेप2 |
| 17 | अकोला | रामी हेरीटेज फ्लॅट ओनर्स सहकारी संस्था म अकोला | एन डी धार्मिक सअ2 |
| 18 | अकोला | श्री.गजानन प्राथमिक शिक्षक सहकारी गृहनिर्माण संस्था म अकोला | के के चंुगडे लेप 2 |
| 19 | बार्शिटाकळी | अजिंठा बहुउदेशिय जंगल कामगार सहकारी संस्था म निंबी | श्री.जे.एस.सहारे सहकारी अधि.श्रेणी 2 |
| 20 | मुर्तिजापुर | विकास मजुर कामगार सहकारी संस्था म बोर्टा | पी.एन.जिरापुरे मुलि |
| 21 | बाळापुर | जनता मजुर कामगार सहकारी संस्था म बाळापुर | श्री.समिर साखरे लेप बाळापुर |
| 22 | अकोट | दुर्गमाता गृहनिर्माण सहकारी संस्था म अकोट | श्री.सुरत्ने सह अधि 2 अकोट |
| 23 | अकोट | अकोट तालुका गृहतारण सहकारी संस्था म अकोट | श्री.सुरत्ने सह अधि 2 अकोट |
| 24 | अकोट | अकोट मजुर कामगार सहकारी संस्था म अकोट | श्री.शिरसाट सह.अधि.2 |

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे